दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६४ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२७ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मराठा समाज़ाला वेगळे आरक्षण द्या आमचा विरोध नाही परंतु आमच्यावर बुलडोजर चालवू नका

## हिंगोली येथील ओबीसींच्या दुसऱ्या एल्गार मेळाव्यातुन छगन भुजबळांचा सरकारला धमकी वजा इशारा



**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली येथील रामलीला मैदानावर ओबीसींचा दुसरा एल्गार मेळावा संपन्न झाला असून या मेळाव्यातुन कुणबी प्रमाणपत्राला स्टे द्या आणि शिंदे समिती ताबडतोब रद्द करण्याची मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.हिंगोली येथील रामलीला मैदानावर अठरापगड जातीच्या ओबीसी नेत्यांच्या पुढाकारातून ओबीसी समाजाचा दुसरा एल्गार मेळावा दिनांक २६/११/२०२३ रोजी रविवारी दुपारी रामलीला मैदानावर संपन्न झाला..या मेळाव्यात हिंगोली, परभणी, नांदेड ,वाशिम, जिल्ह्यातील सर्व अठरापगड ओबीसी नेत्यांच्या पुढाकारातून हिंगोली येथील रामलीला मैदानावर ओबीसी एल्गार मेळावा रविवारी दुपारी घेण्यात आला. अन्नपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी या मेळाव्यामध्ये बोलताना ओबीसी बांधवांना आवाहन केलं की, आपले सर्व मतभेद बाजूला ठेवून ओबीसी उमेदवारांना विजयी करावे सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये अन्यथा सरकारला परिणाम भोगावे लागतील असे धमकी वजा खुले आव्हान दिले त्याचबरोबर सरकारने गठित केलेली शिंदे समिती ताबडतोब रद्द करा असे मंत्री छगन भुजबळ यांनी या मेळाव्या प्रसंगी बोलताना सांगितले आम्ही सर्व अठरा पगड जाती महाराष्ट्रातील व देशामध्ये गुण्यागोविंदाने राहत आहोत.आम्हाला कोणी डिवचण्याचा प्रयत्न करू नये. आम्ही कधीच जाळपोळ केली नाही. कधीच हल्ले करत नाहीत. त्यामुळे आमच्या कोणी नादी लागू नये असे मंत्री भुजबळ यांनी कोणाचं नाव न घेता टीका केली.भुजबळ सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री पदावर असतानां सरकार विरोधात असे वक्तव्य कसे करु शकतात यामागे सरकारचेच शडयंत्र तर नाही ना असा संशय व्यक्त केला जात आहे.भुजबळ यांच्या या अशा बेजबाबदार वक्तव्यामुळे समाजात जातीय दंगली घडवून आल्यास याला जबाबदार कोण.एक ओबीसी नेता मराठा आरक्षणाला विरोध करत असतांना मराठा नेते मात्र मुग गिळून गप्प का बसले आहेत असा प्रश्न मराठा समाजाला पडला आहे.मराठा समाजाविषयी भुजबळ यांना आकस का आहे असेही मराठा समाजाने म्हटले आहे.ते पुढे म्हणाले की,सरकार कोणाच्या एकाच्या सांगण्यावर काम करत असेल तर हे आम्हाला मान्य नाही. या मेळाव्यास ओबीसी नेत्यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले आणि आम्हाला ओबीसीला मिळालेल आरक्षण वाचविण्यसाठी आपण सर्वांनी आपल्यामधील मतभेद , अहंकार सर्व बाजूला ठेवून ओबीसी आरक्षण वाचविण्यसाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत आणि ते करणे गरजेचे आहे असे सांगितले. हम रुके हुए थे लढेंगे और जितेंगे हम मरे हुए नही है एकच पर्व ओबीसी सर्व हा एकच नारा धरून ओबीसीचा आवाज बुलंद करा असेही भुजबळ म्हणाले. मराठी समाजाला वेगळे आरक्षण द्या आमचा विरोध नाही. परंतु आमच्यावर बुलडोजर चालवू नका सरकारने मराठ्याचं एका समाजाच सर्वेक्षण करून चालणार नाही.तर सर्व समाजाचे अठरा पगड जातीचे सर्वेक्षण करा आणि नंतर मागासलेपण ठरवा असेही भुजबळ म्हणाले.मंत्री छगन भुजबळ यांच्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की, आम्ही ओबीसींना कधीच विरोध केला नाही आणि करतही नाही.छगन भुजबळ यांना किती कमी ते त्यांनी घ्यावं किती पोते कमी पडत आहे ते सर्व भरून घ्यावेत सरकारही त्यांचच आहे.आमचा त्याला विरोध नाही. हि सर्व पंगत आमचीच आहे.तुम्हीच आमच्या पंक्तीत येऊन बसलात समाजामध्ये जाती-जातीत तेढ निर्माण करुन आंदोलनं केली. असे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांना प्रतिउत्तर दिले.आता भुजबळ यांच्या पायाखालची माती सरकली असुन त्यांना नैराश्य आल्यामुळे त्यांनी ओबीसी समाजाला भावनिक साद घातली. यावेळी बोलताना ते म्हणाले ओबीसी सर्व बांधवांनां आवाहन करतो की ,ओबीसींच्या सर्व उमेदवारांना आपण विजयी करा. कुठल्याही पक्षात असो आमदार असो की खासदार असो कोणी असो त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले. मंत्री छगन भुजबळ यांचा ढाल तलवार देऊन सत्कार करण्यात आला. या मेळाव्यास ओबीसी समाजाचे नेते विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार कळमनुरी विधानसभा आमदार संतोष बांगर यांनी या मेळाव्याकडे पाठ फिरवली या मेळाव्यास ओबीसी नेते प्रकाश शेंडगे आमदार विधान परिषद, कळमनुरी डॉ. प्रज्ञाताई सातव, बंजारा समाजाचे डॉ. बिडी चव्हाण, सुरेश आप्पा सराफ या सह ओबीसी नेते उपस्थित होते.

## स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारावर महाराष्ट्र चालला तर या राज्या सारखे दुसरे राज्य या देशात नाही

### ज्येष्ठ साहित्यिक व तत्वज्ञ डॉ.ऋषिकेश कांबळे यांचे गौरवोद्गार



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या शिक्षणाचा खरा केंद्रबिंदू स्व. यशवंतराव चव्हाण असुन स्व. यशवंतराव चव्हाण यांना समजून घेऊन त्यांच्या विचारावर महाराष्ट्र चालला तर महाराष्ट्रा सारखे दुसरे राज्य या देशात नाही असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक व तत्वज्ञ डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी काढले.स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने अंबाजोगाई येथे आयोजित केल्या जाणार्या ३९ व्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक, तत्वज्ञ व उदगीर येथे संपन्न झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते संपन्न झाले या प्रसंगी डॉ कांबळे हे बोलत होते.या प्रसंगी समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे, कोषाध्यक्ष सतिष नाना लोमटे, प्रा डॉ सोमनाथ रोडे, प्राचार्य बी बी ठोंबरे, भगवानराव बप्पा शिंदे, मा आ पृथ्वीराज साठे, प्रा डॉ कराड, यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.या वेळी बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे पुढे म्हणाले की, स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सुसंकृत पणाचे स्वप्न पाहिले, त्यांच्या स्वप्नाची कृतज्ञता व्यक्त करणारा हा सोहळा आहे. त्यांनी जी स्वप्न पेरली या स्वप्नांच्या पुर्तीचा वसा देशाने घेतला होता. लोकमान्य टिळकांचा प्रभाव यशवंतराव चव्हाण यांच्यावर होता. १९२७ सालच्या निवडणुकीत ब्राह्मनोत्तर चळवळीचे उमेदवार भास्कर जाधव यांचा त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी प्रचार केला. यशवंतराव चव्हाण यांच्यावर चार वर्तमान पत्राचा प्रभाव होता, त्यांचे वाचन मोठ्या प्रमानावर होते.यशवंतराव चव्हाण यांनी १९३० साली जाणीवपूर्वक महात्मा गांधी, पंडित नेहरू यांचे नेतृत्व स्वीकारले. या काळी त्यांनी भूमिगत काम केले. ब्रिटिशांच्या विरोधातील महात्मा गांधी यांचे उपोषण सोडवण्यासाठी ते एस एम जोशी यांना घेऊन गेले.त्यांच्यावर आईचे संस्कार होते. कराड मधील अस्पर्शाच्या मुलांना शिकता यावे या साठी यशवंतराव अस्पर्शाच्या वस्त्या मध्ये जाऊन शिकवत असत. यशवंतराव समजून घेऊन त्यांच्या विचारावर महाराष्ट्रा चालला तर महाराष्ट्रा सारखे दुसरे राज्य या देशात नाही. १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकाच्या वेळी ते पार्लमेंट्री बोर्डाचे सेक्रेटरी म्हणून नियुक्त झाले. त्यांनी १ मे १९६० मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. व त्या नंतर मराठा व ओबीसी साठी ई बी सी ची सवलत आणली त्या मुळेच ९० टक्के मुलं शिकल्या गेली. नवं बुद्धाला सुद्धा एस सी च्या सवलती मिळाव्यात या साठी ठराव केला. विश्व कोशाची कल्पना त्यांनी आणली. त्यांनी कमान जमीन धारणा कायदा आणला. त्यांनी महाराष्ट्र कसा सुजलाम सुफलाम व निकोप होईल या साठी प्रयत्न केले. मराठवाड्याच्या शिक्षणाचा खरा केंद्रबिंदू यशवंतराव चव्हाण होत. त्यांना पत्नी वेणूताई यांची खंबीर साथ होती. सरळ व संवेदनशील राजकारणी कसा असावा या साठी यशवंतराव यांच्याकडे पहावे लागेल.या कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेसह ३९ वर्षा पूर्वी स्व यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा अंबाजोगाई शहरात जागर सुरू करणारे स्व. भगवानराव बापू लोमटे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून स्वागत गीत संपन्न झाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समारोह समितीचे सचिव दगडू लोमटे, पाहुण्यांचा परिचय डॉ कमलाकर कांबळे, आभार प्रदर्शन प्रा भगवान राव शिंदे यांनी तर सुत्रसंचलन प्रा मेघराज पौळे यांनी केले.

## मातोश्री इंग्लिश स्कूल पुलगाव येथे संविधान दिवस साजरा




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्व. बापूरावजी ओंकार बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था द्वारा संचालित मातोश्री इंग्लिश स्कूल पुलगाव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.संविधान दिनानिमित्त शाळेत रॅली काढण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका उषा ओंकार व प्रमुख पाहुणे म्हणून बेबी तबस्सुम खान उपस्थित होत्या . डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले.शाळेच्या शिक्षिका रंजना जारोंडे यांनी संविधान दिनानिमित्त मुलांना मार्गदर्शन केले. संविधान दिनानिमित्त इयत्ता के जी २ ते इयत्ता ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम पारितोषिक आनंदिनी चिमुरकर, द्वितीय पारितोषिक मान्यता उईके, तृतीय पारितोषिक सम्राट वासेकर, प्रोत्साहन पर झारा खान यांना मिळाले.इयत्ता १ ली ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये वेदांत गलानी यांना प्रथम, भूमिका देवगुणे यांना द्वितीय, तर देवांशू मारबडे यांना तृतीय क्रमांक देण्यात आला. त्याचप्रमाणे रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. प्रथम क्रमांक ईशा निखाडे, द्वितीय क्रमांक ईश्वरी माहुलकर, तृतीय क्रमांक शिवण्या भालाधरे आणि श्रेया नाईक हिला प्रोत्साहन पर क्रमांक प्राप्त झाला.कार्यक्रमाचे संचालन गुंजन कासलीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चेतन वानखेडे , वंदना करवडे , रंजना जारोंडे, रेश्मा वनकर , रेणू ब्राह्मणे , चैताली भेंडारकर , अंजिता राऊत , पूजा पाखरे , पल्लवी शेंडे , ज्योती शनैश्वर , रंजना आढाउ , मोनाली हर्षे , रुपाली यादव , शालिनी हाते , उज्वला हेंडवे , शुभांगी खैरकर तसेच पालकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु.रंजिता राऊत यानी केले .

## आतंकवादी हल्यातील शहिदांना श्रद्धांजली व संविधान दिन साजरा



**वरोरा । प्रतिनिधी**

फौजी वारीअर्स मार्शल आर्टस् वरोरा च्या वतीने २६ नोव्हेंबर २०२३ ला सायंकाळी ६-०० वाजता वरोरा येथिल शहीद योगेश डाहुले स्मारकावर मुंबई येथिल २६ / ११ ला झालेल्या भ्याड आतंकवादी हल्यात शहीद झालेल्या अमर हुतात्म्यांना श्रद्धांजली व संविधान दिन साजरा करण्यात आला . फौजी वारिअर्स च्या विद्यार्थ्यांना यावेळी २६/११ च्या आतंकवादी हल्याची पार्श्वभूमी व आतंकवाद्यांनी हाच दिवस का निवडला याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले . विद्यार्थ्यांना देशासाठी कामी आलेल्या शहीदांविषयीचा आदर आणि सन्मान कायम स्मरणात रहावा हा या आयोजनाचा उद्देश होता . मार्गदर्शनानंतर मौन श्रद्धांजली पाळण्यात आली .यावेळी फौजी वारिअर्सचे पदक विजेते सर्व खेळाडू तसेच प्रशिक्षक डी एन खापने, प्रविण चिमूरकर,रवी तुराणकर ,रवी चरुरकर, दौलत ढोके, सदभावना युवा एकताचे सर्व पदाधिकारी व वरोरावासी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## जन शिक्षण संस्थान बीड येथे संविधान दिन व भगवान बिरसा मुंडा जयंती तथा जनजाती गौरव दिन संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने चक्रधर नगर पांगरी रोड बीड येथील मुख्यालय ठिकाणी भारतीय संविधान दिन व भगवान बिरसा मुंडा यांची जयंती, जनजाती गौरव दिन कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान चे प्रबंध समिती सदस्य प्रा. बाळासाहेब साळवे हे होते तर प्रमुख वक्ते ,नाटककार, नाट्य कलावंत, प्राध्यापक बापू घोक्षे ,प्रमुख उपस्थिती जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक गंगाधर देशमुख होते.संविधान वाचन व प्रार्थनाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी सीमा मनुरकर यांनी केले, सूत्रसंचालन स्वाती जैन यांनी तर आभार सुदाम पालकर यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थानच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

# भविष्याचे ओझे!

ज्या वेगाने विज्ञान प्रगती करीत आहे, त्या वेगाने समाज शहाणा होत नाही, हा आधुनिक काळातील माणसाच्या जीवनातील एक शोकात्म भाग आहे.भूतकाळाचे ओझे पाठीवर वाहात प्रगतीची वाटचाल करायची म्हटले तर थोडा अधिक वेळ लागणारच. बरीचशी ताकद पाठीवरचे ओझे वाहण्यात खर्ची पडते, उरलेली वाटचालीत. प्रवासाला निघताना सुटसुटीत असावे, असे म्हणतात ते काही उगाच नाही.परंतु, जसे भूतकाळाचे ओझे असते, तसेच येणारा भविष्यकाळही चांगलाच वजनदार असू शकतो. अर्थात, हे वजन नेमके किती आहे, बोज्याचा आकार केवढा आहे, या साऱ्या प्रवासाशी निगडित प्रश्नांची उत्तरे अज्ञात असतात. येणारा भविष्यकाळ हा 'लाइट' नसणार, याची झलक आत्ताच पहायला मिळू लागली आहे.गेल्या आठवड्यात 'ओपनएआय'चा शिल्पकार आणि कंपनीप्रमुख सॅम आल्टमन याला संचालक मंडळाने तडकाफडकी काढून टाकले. कुठलेही धड कारण न देता, त्याची नोकरी गेली. 'ओपनएआय' हे वर्तमानाच्या भाषेत 'स्टार्ट अप' असले तरी ते वैश्विक स्तरावरचे आहे. तुलनेने नव्या असलेल्या या कंपनीचा पसाराही तसा मोठा आहे, कारण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातली ही सध्या आघाडीची कंपनी असल्याने चहूबाजूंनी धोधो पैसा त्यांच्या दिशेने वाहात असतो. भविष्यकाळाशी निगडित क्षेत्रात आपली गुंतवणूक असलीच पाहिजे, असा आजकाल मोठमोठाल्या गुंतवणूकदारांचा इरादा असतो, त्यातलाच हा प्रकार.'ओपनएआय'ने बाजारात आणलेल्या 'चॅटजीपीटी' प्रणालीने भल्याभल्यांना बोटे तोंडात घालायला लावली होती. कुठल्याही विषयावर कविता असो, निबंध असो, बायोडेटा असो किंवा पत्र असो, कसलाही मजकूर दोन सेकंदांत तयार करुन देणारी ही प्रणाली क्रांतिकारक मानली गेली.'चॅटजीपीटी' अनेकांच्या नोकऱ्या खाणार, अशी चर्चा सुरु झाली होती, आणि अजूनही ती चालूच आहे. मध्यंतरी हॉलिवूडमधल्या कथा-पटकथा आणि संवाद लेखकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर न करण्याचा इशारा निर्मात्या कंपन्यांना दिला होता, त्यासाठी संपाचे हत्यारही उपसले होते. 'चॅटजीपीटी' ही सतत विकसित होणारी,कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली आहे. कोट्यवधी शब्दांच्या आणि ढाच्यांमधून ती प्रणाली नवा मजकूर निर्माण करु शकते. सॅम आल्टमनचे हे बाळ पुरते मानवी विश्व ग्रासणार असे बोलले जात होते, पण ही तर कृत्रिम बुद्धिमत्तेची अगदीच प्राथमिक पायरी आहे, असाही सूर शास्त्रपंडितांमध्ये निघू लागला.सॅम आल्टमनची गच्छंती त्याच्याच कंपनीतून झाल्यानंतर न भूतो न भविष्यति असे नाट्य घडले. मायक्रोसॉफ्टच्या सत्या नाडेला यांनी आल्टमन यांना आपल्याकडे पायघड्या घालून बोलावून घेतले. पाठोपाठ 'ओपनएआय'च्या ७०० पेक्षा अधिक तज्ज्ञ कर्मचाऱ्यांनी सामूहिक राजीनाम्याचे अस्त्र उगारले.अखेर 'ओपनएआय'च्या संचालक मंडळाने सपशेल शरणागती पत्करुन आल्टमन यांची पुन्हा प्रतिष्ठापना केली आणि सर्व प्रकरणावर पडदा पाडण्याचा निष्फळ प्रयत्न केला. आल्टमन यांना नारळ देणाऱ्या संचालकांपैकी फक़्त एकच उरला, बाकी सगळ्यांना घरी जावे लागले आहे. शेवटी आल्टमन 'ओपनएआय' मध्येच राहिले.कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या या भविष्यवेधी कंपन्या अचानक अशा गल्लीबोळातल्या झुंजी का घेऊ लागल्या? असे कुणाला वाटेल. पण पडद्यामागे घडलेल्या नाट्यामागे भविष्यातील काही भयंकर घडामोडींच्या शक्यता असल्याची कुजबूज आहे. आल्टमन यांच्या फेरनियुक्तीमागे हे गुपित दडले आहे.'ओपनएआय' या कंपनीच्या तंत्रज्ञांनी चॅटजीपीटीच्या पुढल्या अवताराकडे लक्ष देणे सुरु केले होते. 'क्यू-स्टार' नावाचा नवा कमालीचा 'बुद्धिमान' अल्गोरिदम विकसित करण्याचे काम या तंत्रज्ञांच्या चमूने पूर्ण करत आणले आहे,किंबहुना याबाबतीत त्यांना प्रचंड यश मिळाले असून भविष्यात 'मानवी मेंदूपेक्षाही तेज' अशी सामान्य कृत्रिम बुद्धिमत्ता एव्हाना त्यांनी विकसित केली आहे, अशी वदंता आहे. सामान्य कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एजीआय' हे प्रकरण वाटते तितके 'सामान्य' नव्हे!शब्दजुळवेगिरी हे एकवेळ जमून जाण्याजोगे काम आहे, आणि चॅटजीपीटी ते बऱ्याच अंशी चांगले करु शकते. याचे कारण शब्द, वर्ण, वाक्ये यांचे अनेक पर्याय निर्माण होऊ शकतात. गणिताचे तसे नाही. त्यात एकच उत्तर अचूक असते.'एजीआय' ही प्रणाली गणिते सोडवू शकते. तीदेखील मानवी मेंदूपेक्षा कितीतरी वेगात आणि प्रगल्भ पद्धतीने. ही क्षमता एकदा संगणकांमध्ये आली की कृत्रिम बुद्धिमत्तेचे अस्त्र माणसाच्या हातून निसटूनच जाईल, आणि यंत्रमानवांची हुकूमत मानवजातीवर चालेल, अशी सार्थ भीती व्यक्त केली जाते.आल्टमन यांच्या चमूला हेच अमोघ अस्त्र गवसले आणि त्याचा व्यावसायिक वापर करण्याच्या पर्यायावरुन संचालक मंडळाशी त्यांचे वाजले असावे, अशी कुजबूज आहे. 'क्यू-स्टार'च्या विकास कार्यक्रमाशी संबंधित काहीतरी गूढ असे घडले, असे मात्र निश्चितपणाने बोलले जाते.अर्थात या संदर्भात ना आल्टमन यांनी कुठले वक्तव्य केले आहे, ना 'ओपनएआय'ने खुलासा केला आहे. शब्दांचे प्रभुत्व 'चॅटजीपीटी'चे पुढले अवतार मिळवतीलच, त्याला 'क्यू-स्टार' सारख्या प्रगल्भ गणितज्ञाची साथ मिळाली की माणसाच्या हातात फार कमी नियंत्रण उरेल,ही भीती अनाठायी नाही. या अज्ञाताच्या भयापोटीच आल्टमन यांच्या गच्छंतीचे नाट्य घडले, असे मानले जात आहे. आज ना उद्या, कृत्रिम बुद्धिमत्ता आघाडी घेणार, यात शंका नाही. पण या यंत्रबुद्धीचा लगाम मानवाच्या हातातच राहिला तरच भविष्याला काही अर्थ आहे.

# जगाला पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज



जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे.याकरीता जगाने पर्यावरण वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनीशी पर्यावरणाचे संतुलन ठेवुन संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने २६ नोव्हेंबर १९९२ ला विश्र्व पर्यावरण संरक्षण दीवस साजरा करण्याची सुरुवात केली.त्यामुळे संपूर्ण जगात २६ नोव्हेंबर विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो.आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते.परंतु जगातील मानवांच्या अतीरेकामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड, खणन, नदीतील रेती खणन त्याचप्रमाणे सोने, चांदी,हिरे, कोळसा व खनिज संपत्ती इत्यादीवर मानवाने सरळ घणाघाती प्रहार करून निसर्गाच्या मुळावरच मानवाने कुह्राड मारून घाव केल्याचे दिसून येते यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजाती व जीव-जंतु भयभित झाल्याचे दिसून येते.त्यामुळे आज जगाला पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे.भारतात जंगल, पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडुन संरक्षण मिळावे यासाठी २६ मार्च १९७४ ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखालीचिपको आंदोलनास सुरूवात झाली व पर्यावरण संरक्षणाची मिसाल जागृत केली.आज तसे पाहिले तर स्थल,जल,वायु मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते.मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदूषण, वायुप्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळु शकते.आज पर्यावरणात इतके प्रदुषण दीसुन येते की पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे.याचाच परीणाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.भारतासह जगातील वाढती लोकसंख्या हीच पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो.मानवाने आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.आज पर्यावरणावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की जगावं की मरावं कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ वृक्षआहे व त्याला साथ हवी जल व वायूची परंतु हे संपूर्ण दुषित झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत पोहोचले आहे.असेही सांगण्यात येते की पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील १० लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी सुध्दा संपुष्टात येत आहे.मानवाने निसर्गावर एवढा अत्याचार केला की वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळामुळा सकट त्याला उपडुन फेकले.यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत आहे. आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत आहे.त्याचप्रमाणे अनेक औषधोपयोगी वनस्पती लुप्त झाल्या आहेत.जगातील वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती याआधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.भारतात वृक्षांच्या २६०३ प्रजाती आहेत यातील ४६९ प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत म्हणजेच भारतातही गंभीर समस्या आहे.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात व गावात प्रवेश करतांना दिसतात.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.यामुळे जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रृत्व दिसून येते.कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐका-मेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यृशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दीसतात.त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.आज प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषीत केल्याचे दिसून येते.मानवाने स्वत:च्या स्वर्थासाठी पर्यावरणाचे जनुकाय संपूर्ण रक्त पीवुन निचोडुन ठेवल्याचे दीसुन येते.आज जगात विश्र्व शांतीसाठी पर्यावण वाचवीण्याची गरज आहे.आज मानवजातींमध्ये वाढणाऱ्या बिमाऱ्या, अनेक व्याधी व आरोग्याची ढासळती परिस्थिती ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात.यामुळे आज मानवाचे आयुष्यमान दिवसेंदिवस कमी होतांना दिसून येते. पशुपक्षांचेतर जगने अत्यंत कठीण झाले आहे.जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची शर्यत व अनेक परमाणु परिक्षण यामुळे संपूर्ण जग प्रदुषीत होतांना दिसते.आज भारतातील जिवंत उदाहरण म्हणजे भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते.याचाच अर्थ असा की दील्ली आज प्रदुषणाच्याबाबतीत महाभयानक परीस्थिती असल्याचे दिसून येते.आज प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनले की काय असे वाटत आहे.या महाभयानक परीस्थितीत दील्लीवासी मास्कचा मोठ्या प्रमाणात वापर करतांना दिसतात.यामुळे असे वाटते की दील्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटत आहे. संयुक्त राष्ट्राने १९९२ ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती.परंतु याबद्दल कीती देश अलर्ट व सजन आहे हे पहाने गरजेचे आहे.पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे.परंतु त्याला कृतित कोणता देश रूपांतरित करतो त्याला जास्त महत्त्व आहे.कारण आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.याचे उदाहरण म्हणजे अझरबैजान-आर्मेनिया युद्ध आणि गेल्या १९ महिन्यांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता सुरू असलेले हमास-हिजबुल्ला विरूद्ध इस्त्रायलचे भयावह युद्ध. त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यृचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते.मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे.आज पर्यावरण संरक्षणा करीता लोकसंख्येवर नियंत्रण असने गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषीत पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे,भारतासह जगात अनेक वाहन दुषीत धुर ओकत असतात ते कुठेतरी थांबवीले पाहिजे.आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीच्या आरोग्यावर संकट ओढावले आहे यात कॅन्सर,टीबी, मधुमेह,हार्ड अटॅक, डोळ्यांचा त्रास इत्यादी सह अनेक बिमाऱ्या मोठ्या प्रमाणात दीसुन येतात.आज भारत प्रगतीपथावर आहे.परंतु पर्यावरणाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसून येते.याचे जीवंत उदाहरण म्हणजेदील्लीतील प्रदुषण. त्यामुळे भारताने मुख्यत्वे करून पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे.गेल्या ५ ते १० वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, मोठ्या प्रमाणात सुनामी,ग्लेशीअर वितळने,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागुन मोठ-मोठे जंगल संपदा जळुन खाक होने,भुकंप येणे ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची खुली हत्या केल्याने ह्या घटना घडल्याचे स्पष्ट दीसुन येते.त्यामुळे आज पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.भारतात शहरांचे सौंदर्यकरन करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करने बरोबर नाही.त्यामुळे भारत सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे.यामुळे पर्यावण शुद्ध राहिल.पर्यावरन संरक्षण दिनाच्या निमित्ताने मी सरकारला एकच आव्हान करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे व ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जनतेला मी एकच आव्हा करतो की २६ नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून या दीवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे.त्याचप्रमाणे सरकारने घर तीथे झाड ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा,पक्षांना आणि मानवाला फळ व सर्वांना सावली आणि ऑक्सिजन मिळेलयांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल.आज संपूर्ण जगाला पर्यावरण वाचवीण्याची हीच संधी आहे.ही संधी गमावून नये असे मला वाटते.आज पर्यावरण प्रदुषीत झाल्यामुळे नदी,नाले,तलाव, समुद्र प्रदुषीत झाले आहे.यामुळे जलचर प्राण्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झालेला आहे.त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी विश्र्वातील संपूर्ण मानवजातीवर आहे त्या अनुषंगाने सर्वांनी पावुले उचलली पाहिजे.पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षीत,पृथ्वी सुरक्षीत मानव, पशु-पक्षी सुरक्षीत हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.आजच्या अत्याधुनिक युगात मोबाईल टॉवर मोठ्या प्रमाणात दीसुन येते यामुळेसुध्दा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.यावरसुध्दा नियंत्रण आणन्याची गरज आहे.साडे तिनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी निसर्गाचे, पर्यावरणाचे आणि झाडांचे महत्व आपल्या अभंगातून सांगितले होते आणि त्याचे आज अनुकरण होण्याची गरज आहे. वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे ! पक्षी सुस्वरे ! आळविता !! येणे सुख रूचे एकांताचा वास ! नाही गुणदोष ! अंगीयेता !!

रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# देऊ नेतृत्वगुणांना चालना



तुमच्या मुलांमधील नेतृत्वगुणांना चालना दिल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढू होऊ शकतो आणि ते त्यांच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक विकासासाठी लाभदायक ठरते. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी उच्च नेतृत्वकौशल्ये मदत करतात; तसेच सभोवती त्यांना अपेक्षित असणारे बदल घडवू शकतात. एक उत्तम नेता एकाच वेळी ठाम आत्मविश्वास आणि भावनांचे संतुलन साधणारा असतो. त्यांची जबाबदारी ही इतरांवर अधिकार गाजवण्याची नसते, तर त्यांना सूचना देत कृती करून घेत एकत्रित विकसित होण्याची असते. विशेषत: जेव्हा एखादी कठीण परिस्थिती उद्भवते, तेव्हा सगळेच चांगल्या नेत्यावर विसंबून असतात आणि त्याच्यावर विश्वास ठेवतात. तुमच्या मुलांतील नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आम्ही काही टिप्स देत आहोत.तुमच्या मुलांतील नेतृत्व गुण विकसित करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे तुमच्या उदाहरणातून त्याला शिकवण द्यावी. त्यातून सकारात्मक व उत्तम नेतृत्वगुण विकसीत होऊ शकतात. नेतृत्व आणि अधिकार गाजवण्याची वृत्ती यातील फरक समजावून देण्याचा हा सर्वोत्तम मार्ग असेल. जबाबदारी, सहानुभूती आणि परिणामकारक संवादा अशा गुणांची या संवादातून पेरणी होऊ शकेल. आव्हाने कशी हाताळवीत आणि निर्णय कसे घ्यावेत, हे त्याला काही उदाहरणांतून दाखवा. तुमचे नेतृत्वकौशल्य त्याला कृतीतून दाखवा, म्हणजे तुमचा मुलगाही सहज हे गुण त्याच्या आचरणात आणू शकेल.तुमच्या मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य निर्णय घायला आणि त्यांची जबाबदारी स्विकारायला प्रोत्साहन द्या. त्यांच्या अडचणी सोडवायची परवानगी द्या आणि त्यांच्यातील निर्णय घ्यायचे कौशल्य विकसित करण्यासाठी त्याला पर्याय सुचवा; त्यामुळे त्याला आपल्या कृतीमुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी घेण्याचीही शिकवण मिळेल. जस जसे त्यांचे वय वाढेल, तसे त्यांच्यावर एकापेक्षा अधिक जबाबदाऱ्या द्या; त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि नेतृत्वगुणांचा आपसूकच विकास होईल.परिणामकारक संवाद हा नेतृत्वकौशल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मुले स्वतःचे विचार किंवा मते योग्य आणि परिणामकारकरीत्या मांडू शकतील; त्याचबरोबर योग्य शब्दांची निवड आणि शारीरिक हालचालीतून (बॉडी लँग्वेज) या माध्यमातून आपल्या कल्पना इतरांपुढे समर्थपणे मांडू शकतील. मुलांमधील सक्षम संवादकौशल्यांचा विकास केल्याने तुमच्या मुलाला व्यक्त होण्यासाठी मदत मिळेल. विशेष म्हणजे, यातून मुले आपल्या म्हणण्यावर इतरांचे काय मत आहे किंवा त्यांचा दृष्टिकोन समजून घेऊ शकतील. ही गोष्ट यशस्वी नेत्यासाठी महत्वाची ठरते.नेतृत्व म्हणजे केवळ नेतेगिरी नव्हे, तर इतरांसोबत उत्तम पद्धतीने काम करणे होय. तुमच्या मुलांना सांघिक कृतीत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करा; मग ती खेळातील असो, शाळेतील प्रकल्प असो किंवा शालाबाह्य उपक्रम असो. वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांबरोबर काम कसे करावे, याची शिकवण यातूनच त्यांना मिळेल आणि सांघिक कार्य आणि सहकार्याचे महत्त्वही त्यांना समजेल.तुमच्या मुलांना पर्याय निर्माण करण्याची आणि निर्णय घेण्याची संधी उपलब्ध करून द्या. यासाठी कौटुंबिक पातळीवरील एखादा कार्यक्रम किंवा कार्याच्या नियोजनात त्यांना सहभागी करून घ्या किंवा त्यांच्या आवडीनुसार काम निवडण्याचे स्वातंत्र्य द्या. त्यांना पर्याय शोधायला प्रोत्साहन द्या आणि त्यांच्या परिणामांची जाणीव करून देत निर्णय घेण्याची सवय लावा; त्यामुळे पेचप्रसंगात विचार करण्याचे कौशल्य त्यांच्यात निर्माण होईल. हे कौशल्य परिणामकारक नेतृत्वासाठी महत्त्वाचे ठरते.

# ख्यातनाम कथाकार दि.बा.मोकाशी



नाव दिगंबर बाळकृष्ण मोकाशी हे मराठीतील ख्यातनाम मराठी कथा-कादंबरीकार होते. त्यांचा जन्म २७ नोव्हेंबर १९१५ रोजी रायगड जिल्ह्यातील उरण येथे झाला. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर अभियांत्रिकीची पदविका घेतली. लहानपणापासून त्यांना वाचनाचे वेड होते. नाथ माधवांच्या कादंबर्या, प्रिन्स बिस्मार्कचे चरित्र अशा वाचनातून स्वतः लेखन करावे ही ऊर्मी त्यांच्यात निर्माण झाली. लहानपणी मोरोपंतांच्या आर्यांचे पाठांतर वडिलांनी करून घेतल्याने लेखनबीज मनात रुजले.सखोल वाचनाचा पाया पक्का झाल्यामुळे त्यांच्या लेखनाला सखोलता, व्यापकता येत गेली. कथा प्रगल्भ, जीवनदर्शी बनली. त्यांच्या बहुसंख्य कथा या प्रथमपुरुषी एकवचनी आहेत. सरळ, साधी कथा, संयत भाषा, अनलंकृतता व ओघवता प्रवाह; घटना सौम्य रोजच्या आयुष्यातले प्रसंग पण खटकेबाज प्रवाही संवाद, विषयाला हात घालणारी सुरुवात यांमुळे त्यांच्या कथा वैशिष्ट्यपूर्ण झाल्या आहेत.लामणदिवा (१९४७) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर कथामोहिनी (१९५९), आमोद सुनासि आले (१९६०), वणवा (१९६५), चापलूस (१९७४), एक हजारगायी (१९७५), आदिकथा (१९७६), माऊली (१९७६) व तू आणि मी (१९७७) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. स्थलयात्रा (१९५८), पुरूषास शंभर गुन्हे माफ (१९७१), देव चालले (१९६१), आनंद ओवरी (१९७४) व वात्स्यायन (१९७८) ह्या कादंबऱ्या. त्यांपैकी आनंद ओवरी आणि वात्स्यायन ह्या कादंबऱ्या चरित्रात्मक असून त्यांत अनुक्रमे संत तुकाराम आणि वात्स्यायन ह्यांचे भावजीवन त्यांनी रंगविले आहे.आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्यांना आलेले अनुभव घेऊन, माणसे आणि त्यांचे वेगवेगळे स्वभाव समजावून घेऊन त्या आधारे काल्पनिक कथा विश्व साकारत कसदार कथालेखन त्यांनी केले आहे. गूढकथा, पिशाच्चकथा, रहस्यकथा यांसारख्या त्यांच्या वेगळ्या वळणाच्या कथाही निश्चित उल्लेखनीय आहेत. त्याच बरोबर बालसाहित्य देखील त्यांनी लिहिले आहे.विख्यात अमेरिकन कादंबरीकार अर्नेस्ट हेमिंग्वे ह्याच्या फॉर व्हूम द बेल टोल्स ह्या प्रसिद्ध कादंबरीचा घणघणतो घंटानाद (१९६५) ह्या नावाने त्यांनी केलेला अनुवाद उल्लेखनीय आहे. संध्याकाळचे पुणे (१९८०) हे त्यांचे अखेरचे पुस्तक. मोकाशी ह्यांना संध्याकाळच्या पुण्याची जी विविध रूपे दिसली, त्यांचे वर्णनात्मक दर्शन त्यांनी आपल्या लेखाद्वारे ह्या पुस्तकात त्यांनी घडविले आहे.दि. बा. मोकाशी हे १९४० नंतर नवकथेत झळकणारे महत्त्वाचे नाव. मानले जाते.मराठी नवकथेत मोलाची भर घालणाऱ्या प्रारंभीच्या आघाडीच्या कथाकारांत त्यांची गणना होते.दि. बा. मोकाशी यांचे २९ जून १९८१ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर साहित्य अकादमीने १९८८ मध्ये 'दि. बा. मोकाशी यांची कथा' (निवडक कथांचा संग्रह) हे पुस्तक प्रसिद्ध केले.आज मोकाशी यांची १०८वी जयंती. या निमित्ताने त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती देणारा आजचा हा शब्दांजली लेख.

**प्रा.प्रज्ञा मनिष पंडित**
**ठाणे,९३२०४४१११६**

## आंतरवालीत पोलिसांनीच एकमेकांना मारले

# पोलिसांनीच भिंतींच्या विटा काढल्या अन् लोकांवर फेकल्या-मनोज जरांगे



**मुंबई-**पोलिसांना जर मला रुग्णालयात न्यायचे होते तर त्यावेळी का नेले नाही? पोलिस हेल्मेट आणि हातात काठ्या घेऊन आले आणि त्यांनी महिला आणि मुलांवर लाठीचार्ज केला, एवढेच काय तर पोलिसांनी पोलिसांवरच काठ्या हाणल्या असा मोठा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. मनोज जरांगे पाटलांनी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हा गंभीर आरोप केला आहे.दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, पोलिसांना आपले आंदोलन काही करून मोडून काढायचे होते, त्यासाठी ते तयारीनेच आले होते. सगळे आंदोलन शांततेत सुरू असताना त्या ठिकाणी ७००-८०० पोलिस आले, पोलिसांनी उगाचच काहीतरी प्रकार सुरू केले. उगाच कुणाला तरी हटकायचे. त्यावेळी कार्यकर्त्यांनी हात जोडल्याचे व्हिडिओ आहेत. त्यानंतर मग धक्काबुक्की सुरू झाली. त्यावेळी मोठी धूळ उठली आणि कुणीच कुणाला दिसत नव्हते. त्याचा फायदा पोलिसांनी घेतला आणि तुफान लाठीचार्ज केला. त्यामध्ये पोलिसांनी पोलिसानाही लाठ्या मारल्या. त्यावेळी सगळे लोक त्यांच्या हातापायी पडले, पण पोलिसांनी ठरवूनच आले होते. पोलिसांनीच भिंतींच्या विटा काढल्या आणि लोकांवर फेकल्या.मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही जातीयवादी असतो तर प्रकाश आंबेडकर किंवा धनगर समाजाने आम्हाला पाठिंबा दिलाच नसता. जातीयवादी म्हणजे रक्तपात करणे होय, एखाद्या समाजाच्या आरक्षणासाठी बोलणारे जातीयवादी कसे? त्यामुळे सुषमा अंधारेंनी हा विषय जातीयवादाकडे नेऊ नये असा, आरोप त्यांनी केला आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वात उपोषण सुरु होते. या दरम्यान पोलिसांवर झालेल्या दगडफेकीनंतर पोलिसांनी लाठीचार्ज केला होता. त्याचे पडसाद राज्यभरात उमटले होते. या प्रकरणात पोलिस आणि स्थानिक आंदोलक यांनी एकमेकावंर आरोप प्रत्यारोप केले होते. आता या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. यातील मुख्य आरोपी ऋषीकेश बेदरेसह त्याच्या ३ सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

## महायुतीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला

# भाजप २६ तर,शिंदे-अजित पवार गटाला २२ जागा-देवेंद्र फडणवीस



**मुंबई-**महायुतीतील लोकसभेच्या जागावाटपाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्यात भाजप लोकसभेच्या २६ जागा लढवणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर शिंदे गट आणि अजित पवार गट २२ जागा लढवणार असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत फडणवीसांनी याबाबत माहिती दिली आहे.दरम्यान देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, लोकभेच्या ४८ जागांबाबत तीनही पक्षांचे जवळपास एकमत झाले आहे. जिंकणाऱ्या उमेदवारांना संधी दिली जाईल मात्र हा शब्द अंतिम शब्द नसेल, असेही ते म्हणाले. शिंदे गट आणि अजित पवार गट २२ जागा एकत्रीत लढवतील असेही ते म्हणाले.महायुतीमध्ये भाजप, शिवसेना आणि अजित पवार गटामध्ये कुणाला किती जागा मिळणार, याबाबत तर्क लढवले जात होते. आता खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीच खुलासा केला आहे. शिवसेना आणि अजित पवार गटाला हे जागावाटप मान्य असेल का, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महायुतीचा आणि भाजपचा वेगळा सर्व्हे झालेला आहे. त्यातून महायुतीला अंदाज आलेला असून ज्या जागा भाजप जिंकू शकते त्या जागांवर भाजप लढणार आहे. केंद्रात सरकार निवडून आणण्यासाठी महायुतीकडून ताकद लावण्यात येणार आहे. नागपूरमध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फुटेल असेही त्यांनी स्पष्ट केले. देवेंद्र फडणवीस लोकसभा निवडणूक लढवणार अशी चर्चा सुरू आहे. यावरही फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. या बातम्यांमध्ये तथ्या नसून मी लोकसभा निवडणूक लढवणार नाही. नागपूरमधील माझ्या पारंपारिक मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवणार आहे.आरक्षणावरून सुरू असलेल्या गोंधळावरही फडणवीस यांनी भाष्य केले आहे. राज्यभरात सुरू असलेल्या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होतो. एवढेच नाही तर राज्यातील गुंतवणुकीवरही परिणाम होतो. त्यामुळे खुप उशीर होण्यापूर्वी आम्हाला युद्धपातळीवर या समस्या हातळाव्या लागतील. मी मुख्यमंत्री असताना आरक्षण दिले होते, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालाचे परिक्षण करून मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावावा लागेल. मात्र हे करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही याचीही काळजी घ्यावी लागेल, असे त्यांनी म्हटले आहे.

# कर्मचारी संपावर ठाम ! आरोग्य यंत्रणा ठप्प,उपकेंद्रांत ओपीडीही बंद असल्याने सोलापूर जिल्ह्यात रुग्णांचे हाल



**सोलापूर :** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे शासकीय सेवेत समायोजन करावे यासाठी आरोग्य कर्मचारी संघटनेने आंदोलन पुकारले आहे. यामुळे आरोग्य सेवा पूर्णपणे कोलमडले असून नागरिक उपचार अभावी वेदना सहन करताना दिसत आहेत. संपूर्ण आरोग्य व्यवस्था ही देवाच्या हवाली, अशी स्थिती निर्माण झाली तर कर्मचारी संघटना संपावर ठाम आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीमध्ये समायोजन कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना समायोजन तसेच वेतन वाढ याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आरोग्य सेवा आयुक्त यांना याबाबत तातडीने तसा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले. परंतु जोपर्यंत लेखी आदेश येत नाही, तोपर्यंत आंदोलन चालूच ठेवण्याचा निर्णय समायोजन कृती समितीने घेतला आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील आरोग्यवस्था पूर्णपणे विस्कळित झाले आहे. एक महिन्यापासून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे शासकीय सेवेत समायोजन व समायोजन होईपर्यंत समान वेतन या प्रमुख मागणीसाठी काम बंद आंदोलन सुरू असून त्यामुळे संपूर्ण राज्याची आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे.शासनाने लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घेऊन आंदोलनकर्त्यांच्या मागण्या मान्य कराव्या जेणेकरून राज्यातील आरोग्य व्यवस्था सुरळीत होईल व नागरिकांचे हाल होणार नाहीत. अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# पोषण आहाराचा बदल अडकला दरात अंडे ६ रुपयाला अन निधी ५ रुपये




**सोलापूर :** शालेय पोषण आहारात आता अंडी व केळी तथा इतर स्थानिक फळाचा समावेश करण्यात आला आहे. प्रतिविद्यार्थी पाच रुपयांचा खर्च करावा, असे शासनाचे आदेश आहेत. पण, सध्या साडे ते साडेसहा रुपयापेक्षा कमी किमतीत अंडे मिळत नाही. गावरान अंड्याची किंमत दहा रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे पोषण आहारात पहिल्या दिवशी अनेक शाळांनी पोषण आहारात एक अंडे अर्धे-अर्धे करून दोन विद्यार्थ्यांना दिल्याचे चित्र पाहायला मिळाले.सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७९५ शाळांसह महापालिका, नगरपालिका व खासगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीतील चार लाख ७० हजार विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. पोषण आहारात एकूण चार हजार ९५ शाळांचा समावेश आहे.शासनाच्या नवीन निर्णयानुसार पोषण आहारासाठी राज्यातील पात्र शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्यास आठवड्यातील प्रत्येक बुधवार किंवा शुक्रवारी एक अंडे आणि अंडी न खाणाऱ्यांना एक स्थानिक फळ देणे अपेक्षित आहे. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर पहिल्याच शुक्रवारी बहुतेक शाळांनी विद्यार्थ्यांना अंडे, अंडा बिर्याणी-पुलाव व फळे दिली. पण, बहुतेक शाळांनी केळी स्वस्त असल्याने त्यालाच प्राधान्य दिले.डझनभर केळी ४५ रुपयास मिळत असल्याने शाळांनी पाच रुपयांपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता घेतली. परंतु, कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला अंडे मिळाले. दुसरीकडे विद्यार्थी जास्त असलेल्या शाळांमध्ये मात्र काही प्रमाणात अंड्याचे नियोजन करण्यास अडचणी आल्याचेही सांगण्यात आले. अंडे, फळे शाळांमध्ये पुरविल्यास शिक्षक-मुख्याध्यापकांची धावपळ होणार नाही, असाही एक मतप्रवाह तयार झाल्याचे दिसून आले.शासनाच्या नवीन आदेशानुसार प्रतिविद्यार्थी पाच रुपयेच खर्च करायचे आहेत. पण, ना फळ ना अंडे तेवढ्या किमतीत मिळते. गावात कोठे अंडी मिळतात का, याचा शोध काही शाळांमधील शिक्षकांनी घेतला. त्यांना चार-पाच ठिकाणी अंडी मिळाली, पण त्याची किंमत किमान दहा रुपये असल्याने त्या शिक्षकांना तेथून रिकाम्या हाताने परतावे लागले. गावातील दुकानांमधील अंड्याची किंमत सहा रुपये आणि शिजवायचा खर्च वेगळाच, अशीही स्थिती पाहायला मिळाली. या पार्श्वभूमीवर शासनाने आता प्रतिविद्यार्थी सात रुपये द्यावेत, अशी मागणी शिक्षण संचालकांकडे करण्यात आली आहे. त्याठिकाणी सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे, अन्यथा योजना प्रभावीपणे राबविण्यास अडचणी येऊ शकतात.

# ओबीसी आरक्षणाचे संरक्षण कसे करायचे याविषयी प्रकाश आंबेडकरांनी भूमिका स्पष्ट करावी-प्रकाश शेंडगे



**हिंगोली-**राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले ओबीसी आरक्षण संकटात आहे. आरक्षण टिकविणे जशी आमची जबाबदारी तशी प्रकाश आंबेडकरांचीही आहे. त्यामुळे त्यांनी ओबीसी आरक्षणाचे संरक्षण कसे करायचे याविषयी भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती वजा मागणी माजी आमदार तथा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी रविवारी ता. २६ पत्रकारांशी बोलतांना केली आहे.येथील शासकिय विश्रामगृहात पत्रकाराशी बोलतांना शेंडगे म्हणाले की, काँग्रेसचे नेते तथा विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांना सभेला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली होती. त्यांनी त्यास होकारही दिला होता. मात्र त्यांच्या हायकमांडने त्यांना हैदराबाद येथे महत्वाच्या कामासाठी पाठविल्यामुळे ते सभेला येणार नाहीत. मात्र त्यांनी शुभेच्छा संदेश पाठविला आहे. मंत्री छगन भुजबळ व विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार वेगळ्या पक्षात, विचारसरणीत वाढले आहेत. मात्र सध्या ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी सर्वांची सारखीच भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.पक्षीय नेत्यांना त्यांच्या हायकमांडच्या निर्देशाचे पालन करावेच लागते. मात्र आगामी २०२४ च्या निवडणुकीनंतर ओबीसीचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी होती. त्यामुळे त्या निवडणुकीनंतर सर्व हायकमांड लो कमांड झालेला असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.मुंबई येथील संविधान सभेत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भुजबळ व शेंडगे यांच्यावर जोरदार टिका केली. याबद्दल बोलतांना शेंडगे म्हणाले की, आम्ही सध्या ओबीसी आरक्षणाचे संरक्षण कसे करायचे या चिंतेमध्ये आहोत. त्यामुळे कोणाचा नाद करायचा या भुमीकेत आम्ही जाऊ शकत नाही. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला दिलेले आरक्षण संकटात आहे. ओबीसी आरक्षण टिकविण्याची जबाबदारी जशी आमची आहे तशीच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार तसेच नातू म्हणून त्यांचीही आहे. त्यामुळे त्यांनी आरक्षण कसे टिकले गेले पाहिजे, ओबीसी आरक्षणाचे संरक्षण कसे करायाचे हि भूमिका त्यांनी स्पष्ट करावी अशी विनंती असल्याचे शेंडगे यांनी स्पष्ट केले.

# आयुष्य कोकडे झाले वाहून जगाचे ओझे जगला की मेला हे कोणी विचारत नाही

## यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहातील कविसंमेलनास रसिकांचा प्रचंड प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कै. यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहच्या उद्घाटन सोहळ्या नंतर कवितेचा जागर झाला. गुलाबी थंडीत रसिकांच्या प्रचंड प्रतिसादाने रंगलेल्या या कविसंमेलनात शेतकऱ्यांची वेदना, दु:ख, राजकीय विडंबन, सामाजिक वास्तवचित्र शब्दातून बांधणाऱ्या कवितांनी या ३९ व्या स्मृती समारोहातील कविसंमेलनातील सादर झालेल्या कविताला व कवींना रसिकांनी डोक्यावरच घेतले. यंदाच्या कविसंमेनाच्या अध्यक्षस्थानी नागपूर येथील जेष्ठ कवी बबन सराडकर हे होते. या कवी संमेलनात पुण्याचे डॉ. स्वप्नील चौधरी, मंगळवेढा येथील शिवाजी सातपुते, अहमदपूरचे राजेसाहेब कदम, जळगावचे विनय पाटील, अमरावतीच्या प्राचार्या शोभा रोकडे, लातूरच्या शैलजा कारंडे व लातूर सारोळा रेणापूरचे लतिफ शेख या कवींचा सहभाग होता. या कविसंमेलनाचे बहारदार सुत्रसंचालन अहमदपूरचे कवी राजेसाहेब कदम यांनी केले. काळजाचा ठाव घेणाऱ्या कवीचे राजकीय व्यंग कविता सादर करण्यात आल्या. कविसंमेलनाचे अध्यक्ष बबन सराडकर आपल्या कवितेत म्हणतात.

चोचिला चारा कुठला हे कोणी विचारत नाही
भरवता कसे पिलांना हे कोणी विचारत नाही
आयुष्य कोकडे झाले वाहून जगाचे ओझे
जगला की, मेला हे कोणी विचारत नाही

शेतकऱ्यांच्या जीवनाचे वास्तव्य दर्शन करून देणारी ही -हदयी स्पर्शी कविता सादर केली. शेतकऱ्यांची कैफीयत मांडणारी दुसऱ्या कवितेत सराडकर म्हणतात

देह झिजतो मातीत पिके बुडती पाण्यात
आणि त्यांच्या मरणाचा भाव ठरतो दिल्लीत
स्वप्न पेरता पेरता माती संगे माती व्हावे
सुगी येते सुगी जाते हीच चुंगु-मुंगुची लढाई
ज्याचे काळीज फुलाचे त्यासच कापती कसाई

शिवाजी सातपुते यांनी तवा माणुस माणसात होता, आमच्या काळात अस नव्हत ही विडंबन कविता व राजकीय उखाणे सादर करून रसिकांची वाह-वाह मिळवली. वायुसेना दलात कार्यरत असलेले जवान कवी विनय पाटील यांनी जवानाचे वास्तव जीवन दर्शन व व्यथाची कविता सादर केली.

रक्त सांडल-सांडल नाही सांडल इमान
आला उडुन तिरंगा झाला शहीद जवान

सैनिक हयात असतान त्या सैनिकाच्या गावाला, घराला कोणी भेट देत नाही. मात्र शहीद झाल्यास



गावात पाय ठेवण्याची जागा मिळत नाही हेच वास्तव आहे. अमरावतीच्या प्राचार्या शोभा रोकडे यांनी माती माता ही कविता सादर करताना मानवी जीवनात मातीच्या महिमेचे वर्णन करून मातीच आपणा सर्वांची माता असल्याचे कवितेत कथन केले.

माती चिखल माती गुलाब माती जपुन ठेवते पाऊल खुणा
माती पोट फोडुन जिवन देते,
जिव गेला तर समाऊन घेते

आपल्या दुसरी कविता दगड मध्ये म्हणतात

हा देश दगडाचा का दगडी माणसाचा
दगडाला देव बनवतात आणि माणसाला दगड माणुस
उचलला की दगड सापडतो आणि दगड उचलला की माणुस सापडतो

अशी अर्थपुर्ण कविता सादर करून रसिकाची मने जिंकली. पुण्याचे डॉ. स्वप्नील चौधरी यांनी सोनोग्राफी मशिन जेंव्हा माय बनते व राजकारणावर तीव्र प्रकाश टाकणारी दंगल ही कविता सादर करताना म्हणतात चला दंगल समजुन घेऊ खर खोट तपासुन घेऊ धर्मासाठी कडवे आले मतासाठी भडवे आले, कधी सुधरणार आमचे लोक, आपल्या मेंदुची वाटणी करतात, वाचण्यापासुन दूर ठेवुन नाचण्यात गुंतवतात. आम्ही साले भिकारचोट खर खोट तपासत नाहीत.त्याच बरोबर शिवराय आपले, भीमराय आपले चला सारे भारतीय होऊ या दंगलीला फुलस्टॉप देऊ. ही कविता सादर केली व रसिकांची मने जिंकली. या कवि संमेलनात बहारदार सूत्रसंचलन करणारे राजेसाहेब कदम, व शैलजा कारंडे, लतीफ शेख यांनी आपल्या विविध कविता व गझल सादर करून कवी संमेलनात रंगत आणली. प्रारंभी सर्व कवीचे समारोह समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी शाल, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. कवी संमेलनाचे प्रस्तावीक समारोह समितीचे सदस्य प्रा. भगवान शिंदे यांनी केले. तर प्रारंभिक सूत्रसंचालन भागवत मसने यांनी केले. आभार शरद लांगे यांनी मानले. कवी संमेलन ऐकण्यासाठी रसिक पेक्षकांनी प्रचंड गर्दी केली होती.

# संविधान दिनी डॉ.बाबासाहेबांना हंसराज अहीर यांनी वाहीली आदरांजली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२६ नोव्हेंबर १९४९ हा दिवस स्वतंत्र भारतासाठी मोठा ऐतिहासिक दिवस होता. तो समस्त भारतीयांसाठी सोनेरी क्षण सुध्दा होता. संविधानाचे जनक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला याच दिवशी संविधान सोपविले होते व संविधान सभेने विधीवत स्वरुपात स्वीकारत देशाला संविधान समर्पित केले. या संविधानाने लोकशाहीची पुनर्स्थापना करीत देशात समानता, न्यायहक्क, बंधुभाव दिला आहे. आज संविधान हा राष्ट्रीय दिन म्हणुन साजरा होत असल्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी सांगतानाच उपस्थितांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सन २०१५ मध्ये संविधान दिवस साजरा करण्याचा निर्णय घेवून भारतीय संविधानाबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनात जबाबदारीची भावना निर्माण केली आहे असे ते म्हणाले. सुरुवातीला हंसराज अहीर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली




वाहुन संविधानाप्रती सन्मान व निष्ठा राखण्याचे सर्वांना आवाहन केले.याप्रसंगी खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, रवि गुरनूले, धम्मप्रकाश भस्मे, ॲड. राहुल घोटेकर, राजेंद्र अडपेवार, सविता कांबळे, रेणुका घोडेस्वार, स्वप्निल कांबळे, राहुल सुर्यवंशी, शीलाताई चव्हाण, शीतल गुरनुले, श्याम कनकम, किरण बुटले, राहुल सुर्यवंशी, स्वप्निल मुन, दिनकर सोमलकर, राजेश थुल, विठ्ठल डुकरे, सचिन कोतपल्लिवार, रवि लोणकर, राजेंद्र खांडेकर, प्रलय सरकार, अनिल सुरपाम, चंदन पाल, चांद सय्यद, अमित निरांजने, जहीर रजा, विक्की मेश्राम, राहुल नगराळे, जितेंद्र वाकडे, सुनिल महातव यांचेसह भाजपा पदाधिकारी व विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# हरिश्चंद्र वाडगुरे याच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्याने अमृतमहोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

**मूल । प्रतिनिधी**

सेवानिवृत्त मुख्याध्यापक हरिश्चंद्र वाडगुरे यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्याने कुटूंबीयाच्या वतीने अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन मूल येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मूल शहरातील राजकीय सामाजिक तसेच पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.अत्यंत गरीब परिस्थितीतुनशिक्षण घेत त्यांनी मिळवलेली शिक्षकांची नौकरी प्रामाणिक पणे पार पाडत आपल्या कार्यकाळात अनेक गुणवत विद्यार्थ्यांना त्यांनी घडविले.त्यांनी त्याच्या नौकरीच्या काळात गरीब परिस्थितील अनेक मुलींना उच्चशिक्षणासाठी मदतीचा हात देत मदत केली आहे.त्यांच्या अमृतमहोत्सव सोहळ्याला मूल शहरातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवीत त्यांना भरभरून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यात प्रामुख्याने चंद्रपूर जिल्हापरिषदच्या माजी अध्यक्ष संध्याताई गुरुनुले, राष्ट्रवादी कॉंग्रेस




पार्टीचे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार, व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भोजराज गोवर्धन, जेष्ठ झाडीबोली साहित्यिक शशिकला गावतूरे,नामदेव गावतुरे,माणिकचंद जगताप , शेख , येनगंटीवार , श्रावण लोणबले, नौकरीपासून सहकारी असलेले चामोर्शी येथील देशमुख , मीराताई शेंडे, दिलीप शेंडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. याप्रसंगी संध्याताई गुरुनुले यांनी हरिश्चंद्र वाडगुरे याच्या जीवनप्रवासाचा उलगडा करीत त्यांना शंभरी गाठण्याच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कुटूंबातील सदस्य हरिश्चंद्र वाडगुरे याचे चिरंजीव इंजि. इर्तीश वाडगुरे, जावई सेवानिवृत्त प्राचार्य शामरावं सोनुले यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले.इतरही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

कार्यकर्माचे संचालन सुरेश फुलझेले यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेखा इर्तीश वाडगुरे यांनी केले.

# ग्रामपंचायत जयपूर येथे संविधान दिना निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन



**वर्धा । प्रतिनिधी**


ग्रामपंचायत जयपूर येथे दिनांक २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माला अर्पण करून आपला संकल्प विकसित भारत रॅली चे आयोजन, शासनाच्या विविध योजनांची ग्रामस्थांना माहिती देऊन संविधान दिन साजरा करण्यात आला . तसेच महिला बालकल्याण विभागामार्फत टी एच आर आणि बेबी केअर किटचे लाभार्थ्यांना वाटप सरपंच्याचा हस्ते करण्यात आले. पोषण अभियान अंतर्गत पौष्टिक परसबाग या संबंधित वंदना नागोसे (पर्यवेक्षिका महिला बाल कल्याण विभाग) यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. आरोग्य उपकेंद्र जयपूरच्या वतीने ग्रामस्थांना आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायतच्या सरपंच किरण आंबुलकर, उपसरपंच प्रशांत थुल, ग्रामपंचायत सदस्य गणेश तुळसकर,अंबादास तोडासे, मनीषा चौधरी, अस्मिता थुल,वर्षा वाघाडे, प्रतिभा करडे, सागर मसराम. ग्रामविकास अधिकारी शुभांगी भोळे,उमीदचे मत्स्य सखी रंजना पिंपळकर. प्राथमिक शाळा जयपुर चे मुख्याध्यापक मोहिजे व भूतकर तसेच अंगणवाडी सेविका वैजयंतीमाला मून,ममता बेसेकर, रीना थुल, नर्मदा ,आरोग्य विभागाचे जया पराते, संजय कदम, सविता सूर्यवंशी, विशाखा गणवीर रोजगार सेवक अतुल राऊत व समस्त ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते .

# सालोड हिरापूर येथे संविधान दीन साजरा



**वर्धा** -स्थानिक इंद्रप्रस्थ न्यू आर्टस कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथील समाजकार्याचा विद्यार्थ्यांनी सालोड हिरापूर येथील ग्रामपंचायत मध्ये संविधानाच्या प्रस्तविकेचे वाचन केले या दरम्यान प्रा. सिद्धांत ढोके यांनी भारताचे लोक म्हणून सर्व भारतीयांना स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, अस्तित्व बहाल करणाऱ्या गौरव ग्रंथ म्हणजेच भारतीय संविधान. असे मार्गदर्शन केले. या दरम्यान अमोल कनाके सरपंच, आशिष कूचेवार उपसरपंच, प्रा सिद्धांत ढोके ग्रामपंचायत सदस्या, ग्रामपंचायत कर्मचारी, प्रा सिद्धांत ढोके, यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षिगांधा वाटकर, साक्षी पवार, श्वेता दांडेकर, गायत्री पेंदाम, आकाश धूर्वे, सुयोग शेंडे, पियूष श्रीराव, रोहित तूरक, यश बेले इत्यादी विद्यार्थी उपस्थित होते.

# इंडियन मिलिटरी स्कूल येथे संविधान दिवस उत्साहात साजरा



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय इंडियन मिलिटरी स्कूल येथे संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे पर्यवेक्षक नितिन कोठे तर प्रमुख पाहूणे मनोज लोटे , प्रमूख अतिथी कु. मरापे या मान्यवरांच्या हस्ते संविधान शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन माल्यार्पण करण्यात आले.त्यानंतर अथिती कु. मरापे यांनी संविधान दिवस निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.प्रमूख पाहूणे मनोज लोटे यांनी संविधान शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संविधान निर्मिती साठी लागलेला कालावीधी तसेच आलेल्या अडचणी आणि संविधान महत्व यावर मार्गदर्शन केले.अध्यक्ष नितीन कोठे यानी विद्यार्थी दशेतच भारताचे संविधान सर्व विद्यार्थ्यांना माहित असावे, तसेच संविधानाचा अभ्यासात समावेश आहे, प्रत्येक व्यक्तीने संविधानाची एक प्रत आपल्या प्रत्येकाच्या घरी असावी, याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर शाळेत संविधानाचे उद्देशिका तयार करुन त्याचे फलक शाळेत लावण्यात आले. या महत्वाच्या दिवशी शाळेत चित्रकला स्पर्धा , निबंध स्पर्धा भित्तीपत्रक स्पर्धा आयोजन करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन बापूराव टाले यांनी केले तर आभार प्रदर्शन वैशाली दुधे यांनी केले.कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# आर.के.हायस्कूल मध्ये संविधान दिन

**पुलगाव । प्रतिनिधी**

आर.के.हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय पुलगाव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.शालेय परिसरात आयोजित या कार्यक्रमाला संस्थेचे प्राचार्य संजय सहारे,मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव,ज्युनियर कॉलेज चे उपप्राचार्य सुनिल भोयर पर्यवेक्षक गणेशराव इंगळे,लालबहादूर यादव व जितेंद्र वर्मा उपस्थित होते.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची आणि भारतीय संविधानाच्या प्रतीची पूजा व



माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.या कार्यक्रमात उद्धेश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले..त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मंदा चौधरी यांनी केले कार्यक्रमाला पूर्व माध्यमिक,माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वच शिक्षक व विधार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.त्यानंतर संविधान रॅली काढण्यात आली.

# सरपंचाच्या मेहनत, जिद्द, चिकाटीमुळे, जुई धरण प्रकल्पा मध्ये चर खोदून विहिरीमध्ये पाणी आणण्यात यश

**दानापुर । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे जुई धरण प्रकल्पामध्ये चर खोदून विहिरीमध्ये पाणी आणण्यात आले यावर्षी अत्यल्प पावसामुळे पाण्याची टंचाई पहिल्यापासून भासत होती पण आता जुई धरण प्रकल्पामध्ये चर खोदण्यात आले त्या चरांमधून पाणी विहिरीमध्ये टाकण्यात आलेले आहे दानापूरला पाणी टप्प्याटप्प्याने पुरवल्या जाईल असे सरपंचांनी सांगितले सरपंच अहोरात्र मेहनत करून रात्र चा दिवस आणि दिवसाची रात्र करून पाणी विहिरीमध्ये टाकण्यात यश आले आहे. जोपर्यंत पाणी पुरवल्या जाईल दानापूरला नियोजन पद्धतीने टप्प्याटप्प्याने आम्ही पाणी पुरवणार जेव्हा पाणी कमी पडेल तेव्हा आम्ही आमच्या पद्धतीने टँकरच्या माध्यमातून दानापूरला पाणी पुरवण्यात आम्ही कटिबद्ध राहू असे सरपंचांनी सांगितले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .